# खिडकीतल्या कविता

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३५०



REFBK-0022357
REFBK-0022357

विद्याधर वैद्य

संदर्भ
२२३५८
काव्य
१५१०१५
२३५०

# खिडकीतल्या कविता

विद्याधर वैद्य

REFBK-0022357
REFBK-0022357

' कै. विद्याधर वैद्य काव्य-प्रकाशन समिती ', धुळे.

किंमत पाच रुपये

प्रकाशक :

'कै. विद्याधर वैद्य काव्य-प्रकाशन समिती'

मा. य. वैद्य
पुरुषोत्तम पाटील
वा. रा. सोनार

*

मुद्रक :

तापीराम दौलत चौधरी
मित्र प्रिंटिंग प्रेस,
शामप्रसाद, नगरपट्टी,
धुळे.

*

पहिली आवृत्ती :

प्रथम प्रकाशन : १ फेब्रुवारी १९७६
( पहिले धुळे जिल्हा मराठी साहित्य संमेलन )

*

विक्री व वितरण व्यवस्था :

' साहित्य संघ, धुळे '

*

सर्व हक्क श्रीमती शालिनीबाई पुरुषोत्तम वैद्य यांच्या स्वाधीन.

## ऋणनिर्देश

कै. विद्याधरच्या कवितेचा परिचय पहिल्या प्रथम सुप्रसिद्ध मराठी समीक्षक श्री. त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी 'सत्यकथे'तून मराठी रसिकांना करून दिला. त्यांचे आणि 'सत्यकथे'च्या संपादकांचे ऋण महत्त्वाचे आहे.

यादव खैरनार, भगवान ठाकूर, या विद्याधरच्या निकटच्या स्नेह्यांनी कवितांची मूळ संहिता उपलब्ध करून दिली म्हणूनच हा संग्रह प्रकाशित करणे शक्य झाले.

विद्याधर व त्याची कविता यांवरील नितांत प्रेमामुळे 'कै. विद्याधर वैद्य काव्य-प्रकाशन समिती'ला अनेक रसिक मित्रांनी निधी गोळा करून मोलाची आर्थिक मदत केली.

स्थानिक चित्रकार दिलीप भावसार यांनी मुखपृष्ठाचे आकर्षक व उचित रेखाटन काढून दिले.

मुद्रिते तपासण्याच्या बाबतीत प्रा. पुं. म. चित्ते यांचे अपरिमित साह्य झाले.

'मित्र प्रिंटिंग प्रेस'चे मालक तापीराम चौधरी व त्यांचे सहकारी यांनी अत्यंत अल्पावधीत छपाईचे काम पूर्ण करून दिले.

या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

— पुरुषोत्तम पाटील

('प्रकाशन समिती' करिता)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | अखेर मीच हरलो | २ |
| २ | अंधारवेणा | ३ |
| ३ | माझा शिशिरडोळा | ४ |
| ४ | घराकडे | ५ |
| ५ | अंकुर | ६ |
| ६ | क्लिफ्स | ७ |
| ७ | विश्वास | ८ |
| ८ | तूच दुपारू नयेस | ९ |
| ९ | रस्ते | १० |
| १० | साठ वजा ती | ११ |
| ११ | गडांचा सूर्यास्त | १२ |
| १२ | स्वप्नांच्या धूम्ररेषा | १३ |
| १३ | जीवनग्रंथ | १४ |
| १४ | शून्य आभाळ | १५ |
| १५ | खाज | १६ |
| १६ | धूसर आठवणीतील एक | १७ |
| १७ | कांहीच खरं नसतं | १९ |
| १८ | कोमेजणे | २१ |
| १९ | देठ | २२ |
| २० | निरग्नि शिशिर | २३ |
| २१ | स्वतःस सरणून | २४ |
| २२ | ही निराशय जडता | २५ |
| २३ | अंदाज जन्माविषयीचा | २६ |
| २४ | तीन कविता | २७ |
| २५ | हाक | २८ |
| २६ | दिशाभूल | २९ |
| २७ | अवर्षणाची बांग | ३० |
| २८ | उत्खनन | ३१ |
| २९ | वासना-वादळ | ३२ |
| ३० | उरलेल्या गोष्टी | ३३ |
| ३१ | असं वाटतं कधी कधी | ३४ |
| ३२ | रुधिरलिप्त द्विपपद | ३६ |
| ३३ | अशा तशा मैफलीत | ३७ |
| ३४ | 'मी' चे संशोधन | ३८ |
| ३५ | अंधाराचा रस्ता | ३९ |
| ३६ | चिन्तन | ४० |
| ३७ | नियती | ४१ |
| ३८ | उजेडात | ४२ |
| ३९ | न्याय | ४३ |
| ४० | मी : गतिमान | ४४ |
| ४१ | स्मृतिममीवर | ४५ |
| ४२ | पापणीकड जळत जळत | ४६ |
| ४३ | लग्न | ४७ |
| ४४ | तारका तळाच्या | ४८ |
| ४५ | मनाचा गलबला | ४९ |
| ४६ | उदबत्तीच्या रेशमधुरासारखे | ५० |
| ४७ | प्रश्नचिन्ह | ५१ |
| ४८ | आनन्द सैगल | ५२ |
| ४९ | एकटा | ५३ |
| ५० | आत्महत्येपूर्वीच्या कविता | ५८ |
| ५१ | टेक् ऑफ् | ६० |

२२३५६
का१०५
२३५०

# * व्याधाहातींत सुटला !

( ले०– त्र्यं. वि. सरदेशमुख )

"…. Horatio, I am dead;
Thou livest; report me and my cause aright
To the unsatisfied."

HAMLET ( V : 2 )

१९७४. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात धुळ्याहून एक पत्र आले : तुमची सगळी पुस्तके माझ्यापाशी आहेत, कवितांचा संग्रह तेवढा मिळाला नाही म्हणून वाचलेला नाही. तर 'उत्तररात्र' च्या दोन प्रती पाठवाल ? मी त्यांचे पैसे पाठवीन.

खानदेश हा मुलुख मला परदेशाइतका परका. पत्राचा लेखक विद्याधर वैद्य परिचयाचा नव्हताच. कविता मुद्दाम मागवून घेऊन वाचणारा असा कुणी भेटावा हे विरळाच.

पुस्तकाच्या प्रती पाठवल्या. भेट म्हणून. मूल्य पाठवू नये असे लिहिले. पत्रलेखकाने स्वतःची ओळख करून दिली आणि कवितेविषयीचे आपले विचार कळवले तर मला बरे वाटेल, असेही म्हटले.

चारसहा दिवसात उत्तर आले. चांगले पाच पानी. इतके मोकळे, इतके उल्हासाचे, इतके प्रेमभराने लिहिलेले…. असाही अनपेक्षित धक्का बसतो कधी कधी. लेखकाला हुरूप देणारा.

विद्याधर वैद्य हा एक कोवळा पोरगा निघाला. टी. वाय. बी. कॉम. चा विद्यार्थी. वय वीस.

"तुमच्या पत्रानं मी इतका एक्साइट झालो की सबंध दिवसभर मी आपणाशी बोलत होतो. . . ग्रेसवरील तुमच्या लेखाची आतुरतेनं वाट पाहतोय. . तुम्ही नेमाडे, तेंडुलकर, डहाके यांच्यावर काहीतरी लिहाच . . . 'कोसला'विषयी

---

* संपादक ' सत्यकथा ' यांच्या सौजन्याने पुनर्मुद्रित.

तुम्हाला काय वाटते ? ...तुमच्या 'बखर...' चा विचार पुरेसा कुणी केलेलाच नाही...मी सायन्सला जावं अशी सगळयांची इच्छा मोडून इकडं कॉमर्सला आलो अन् आता वाटतं, हेही चुकलं. सगळंच तिरपागडं आहे खरं... एक कविता 'सत्यकथे'त येऊन गेली. नंतर कुठेच पाठवली नाही. 'बखर...' वृत्तीमुळे माझा कुठलाच उत्साह नीटसा टिकत नाही.''

ही विद्याधरच्या पत्रातील काही वाक्ये. पत्रभर एक आदब. एक प्रेमभाव. एक विलक्षण जवळीक.

बारा एप्रिलला माझ्या हाती विद्याधरच्या एका मित्राचे पत्र आले...की विद्याधरने एक एप्रिलला झोपेच्या गोळ्या खाऊन जीव दिला.

विद्याधरच्या दुसऱ्या एका मित्राने आणखी काही दिवसांनी एका दीर्घ पत्राने त्या दुर्घटनेचा सविस्तर वृत्तांत कळवला. विद्याधरच्या कवितांची वही माझ्याकडे पाठवून दिली.

तो त्या पत्रात लिहितो : ''बाबा वैद्य हे एक गूढ होतं. आऊटसायडर... 'कोसला'चा बाबावर जबरदस्त परिणाम होता. कुठल्याही गोष्टीची टर तो सुरेख उडवायचा. वाचनाचं त्याला भयानक वेड... गेल्या तीन वर्षांपासून त्याला निद्रानाशाचा त्रास व्हायचा. एकदा वैतागून म्हणाला होता : सालं, जीव अगदी नकोसा झालाय...असामान्य सामंजस्य (मॅच्युरिटी) आणि बुद्धिमत्ता यामुळे तो माझ्यापेक्षा चार वर्षांनी लहान असूनही मोठा वाटायचा. पूर्वी बाबा मित्रांजवळ आत्महत्येबद्दल बऱ्याच वेळा बोलला होता. एकाला तर म्हणाला होता, आपण जाऊ तर एक एप्रिलला. सगळ्यांना फसवून. त्याचं हे बऱ्याच वेळा चालायचं. मित्रांना तो विनोद वाटायचा.''

१९७४ : एक एप्रिल. रविवार. आधल्या रात्री साडेबाराला घरी आल्यावर विद्याधर आईला म्हणाला : सकाळपर्यंत अभ्यास करणार आहे मी. झोप झाल्यावर उठेन. तेव्हा मला उठवू नकोस.

विद्याधरचे वडील चार वर्षांपूर्वी वारलेले. एक लहान पांगळी बहीण दोन वर्षांखाली गेलेली. आई कुणाची घरकामे करायची. तशी ती त्या रविवारी सकाळी बाहेर गेली. साडेअकराला परत आली. विद्याधरच्या खोलीतून घोरण्याचा मोठा आवाज येत होता. थोड्याच वेळात प्रकार उघडकीस आला.

डॉक्टरी उपचार सुरू झाले. ती रात्र कशीबशी गेली. पण दुसऱ्या दिवशी सगळे बिघडले. संध्याकाळी संपले. ‘ टेक ऑफ ! ’

एका कवितेत विद्याधर लिहितो :

गतीची बीजं हृदयात फुलावीत
असे श्वासच अस्तित्वात नाहीत
सगळीकडें उछ्वासाच्या घरघरीची
कोंदटलेली घरं . . .
त्यांच्या दारांना मळलेले पडदे
बाहेरचा अंधार कळू नये म्हणून.

कुठं जाणार ह्या एकाच विचारानं अडवलेले सगळे रस्ते
परत फिरण्यासाठी निदान घर असतंच हे ठीक.

उद्याच्या चित्रात रंग असेल
म्हणून आजची रंगहीन रेखाटणं
पुढच्या ओळीतून कदाचित सांगता येईल
म्हणून आधीची ओळ खरडणं
—एकूण सगळयाच ओळी खरडलेल्या
वाटयाला आलेले सगळेच प्याले बेचव जहरी नाहीतच.
वाटायच्या गोष्टी वाटतच राहतील
टेक-ऑफ ला सगळंच उचललं जाईल
माझ्यासुद्धा . . . सगळयासुद्धा.

मित्रांच्या संगतीत हसतखेळत बोलणारा, त्यांची टर उडविणारा, दुसऱ्यांना फार समजून घेणारा विद्याधर आतून विस्कळित झालेला होता. अत्यंत निराश. . . कशावर विश्वास नसलेला.

कोठेही जा गावे ओसाडच
प्रत्येक गावी एक नदी वाहते पण माणसं कोरडीच
सकाळी सूर्य पेटला तरी संध्याकाळी अंधार उलगडतोच
अखेर वड कितीही वाढला

—पारंब्या जमिनीकडे धावतातच
—अशावेळी सगळ्यावरचा विश्वास उडतो.

स्वत:वरचाही विश्वास संपतो तेव्हा माणसाच्या मनाला रानभैरीपणा येतो:

हरवलेल्या वाटा सापडत नाहीत
आवळलेले फास सुटत नाहीत
काळाची कानस घासत राहते
तरी आकारकिनारा मिळत नाही
तसा तसा मी स्वत:ला शोधत भिंभिरलो
असा असा जग हरवत गेलो
अखेर मलाच हरवलो.

डोंगरावरल्या टाक्याच्या पाण्यासारख्या खोल पण तळापर्यंतचे स्वच्छ दर्शन देणाऱ्या कविता विद्याधरने लिहिल्या आहेत. त्या लिहून त्याला मासिकांतून मिरवायचे नव्हते. प्रतिमांचे गिचमिड जंतरमंतर मांडून स्वत:ला भुलवायचे नव्हते, की वाचकांना बुजवायचे नव्हतें.

सफलतेच्या, आशेच्या आणि उत्थानाच्या भावनांची अभिव्यक्ती तेवढी समाजोपयोगी : विफलतेचे, वेदनेचे आणि असहायतेचे सूर हे समाजविनाशक असे मानणाऱ्या समीक्षकांनी गेल्या पन्नास-साठ वर्षांतल्या मराठी कवितेने दिलेल्या वैफल्याच्या उच्चाराला वेगवेगळ्या कारणांनी धारेवर धरलेच आहे. "all is not well; I doubt some foul play." इतकेसुद्धा हॅम्लेटप्रमाणे ज्यांना सभोवतालच्या परिस्थितीतले विषारीपण जाणवत नाही, जाणवले तरी त्याचे गांभीर्य कळत नाही, कळले तर ते बोलायला ज्यांची जीभ कचरते, ते तसे बोलून दाखवणाऱ्या कवीला पाण्यात पाहतात. त्याला 'जंतू' ठरवतात आणि त्याचा वेदांत विस्मृतीच्या किंवा अनुल्लेखाच्या गर्तेत गाडावा म्हणतात. 'अनुभूतींशी इमान ', 'अभिव्यक्तीचा सच्चेपणा' या गोष्टी मोठ्या तोंडाने अपेक्षायच्या : पण इमानदारीचे व सच्चेपणाचे तेज जाळू लागले की बोंब ठोकायची, आग लावतोय म्हणून. अशी आमच्या येथे निरपेक्ष आणि नि:पक्षपाती

भासणारी पण आतून सोवळी आणि सुरक्षितपणाला लालचावलेली समीक्षा. कवींना वठणीवर आणायचे व काव्याला आशावादी, ध्येयवादी करायचें ही तिची महत्त्वाकांक्षा. तिची चालू हायब्रौ पद्धती म्हणजे घाटाचा व आकृतीचा छल करणारी ... तर्कसौंदर्यवादी मीमांसा करणारी.

अर्नेस्ट हेमिंग्वे, स्टीफन झ्वाइग, मेरिलिन मन्रो ही जगाचे प्रेम संपादन केलेली थोर कलावंत माणसे...साने गुरुजी, डॉ० खर्डेकर, प्रिन्सिपल दबडघाव या मराठी मुलुखात आपापल्या क्षेत्रात पराकाष्ठेच्या कर्तव्यदक्ष म्हणून गौरवानें मानल्या गेलेल्या व्यक्ती... आपल्या हातांनी मरण ओढवून घेतात कशापायी? जे काही आहे, किंवा जें काही होईल म्हणून त्यांना वाटत होते ते नाहीच, किंवा कधी अस्तित्वानुभवात येणारच नाही, याची खात्री त्यांना कशाने पटली? आशयाचे सत्त्व नाहीसे झाले तर शरीराचा कोंडा तसाच कशाला जपायचा— नैसर्गिक मरणाची फुंकर पडेतो— असे त्यांच्यासारख्यांना वाटले असेल तर जीविताचा आशय हीसुद्धा किती स्वप्नभंगुर गोष्ट असेल? निराशय अनुभवावस्था त्यांना किती भयावह आणि त्याज्य झाली असेल ?

गिल्डेन्स्टर्न व रॉझेंक्रांझ हे हॅम्लेटचे समवयस्क स्नेहशील उमराव... राजाराणीच्या सांगीवरून हॅम्लेटला भेटतात. त्याचे दुखणे समजून घ्यावे, जमल्यास ते दुरुस्त करावे यासाठी त्यांची खास योजना. औपचारिक आगतस्वागत, थट्टाविनोद झाल्यावर जे बोलणे होते त्यात हॅम्लेट त्यांना सांगतो : “ मित्रांनो, मला भेटायला म्हणून आलात खरे. पण आजकाल हा डेन्मार्क देश एक कैदखाना झाला आहे. ” रॉझेंक्रांझ म्हणतो : “ तुमच्या मनाचा आवाका मोठा म्हणून तसं वाटतंय. ” त्यावर हॅम्लेट सांगतो की : “मला जर वाईट वाईट स्वप्नं पडत नसती तर एखाद्या संपुटात कोंडून घेऊनही अनंत अंतराळाचा राजा मी स्वतःला मानलं असतं ... मित्रहो, अलीकडे, कशानं कुणास ठाऊक, माझा सगळा उल्हास मावळला आहे. वाटतं की, ही पृथ्वी वांझोटी आहे आणि चंद्रसूर्यांच्या प्रकाशानं झळकणाऱ्या आकाशात गलिच्छ धुरानं आणि हवेनं भयानक साथी पेरल्या आहेत ! ” (अंक २, प्रवेश २)

हॅम्लेटचा राजसिंहासनाशी संदर्भ छेदून टाकला आणि त्याचे परदेशीपण हिरावून घतले की आपल्याच अवतीभवती त्याची एकनाळ भावंडे दिसू लागतात.

विद्याधर वैद्य हा त्यांतला एक.

विद्याधर लिहितो :

हे पृथ्वीचं केंद्र तुला सतत खेचतंय
ही निराशय जडता तुला गिळू पहातेय
. . . तुला सुटता येत नाही आखल्या वर्तुळातून
नीट समजून घेता घेता धडपड मंदावेल तुझी.

'तीन कविता : आत्मखुन्याच्या', 'आत्महत्येपूर्वीच्या कविता' अशा निष्कपटी शीर्षकाच्या काही कविता या वहीत भेटतात. त्यातल्या काही ओळी अशा :

मी 'कोसला' सोसला आहे
'पांडुरंग' पोसला आहे
. . .मनाच्या थडग्यात चितांची प्रेते
इच्छांची थिजली थारोळी
संस्कृतीच्या उद्‌बत्त्या वरती
आणि छद्‌मी फुलं हास्याची
—कोणी तरी शोधा रे माझा खुनी !
. . .कुठल्या प्रदेशात वहावतोय ?
सवेदनांची दारं करकरत बंद
होताहेत का ?

कसली जड कुलुपं लटकलीत ?

अखेरचं खरं सांगून टाक
वेळ थोडा आहे
बोधिवृक्षाची फुलं चुकून
पडतील कबरीवर.

विद्याधरला "रिलेशन्सची ॲबॉर्शन्स" जाणवतात. कसला घायाळ चीत्कार देणारा शब्दप्रयोग हा ! "कुणी तरी शोधा रे माझा खुनी !" हाही तसाच.

एकाकी प्रवासात तापत आणि गोठत जातो तो... काळच्या अपूर्णतेच्या रेषा आजच्या आकृत्यांना ओठंगून राहतात याची त्याला चीड येते---कधींतरी गोड दळदार असतीलही पहाडावरची बोरे. पण आता बोराबोरात आळचा माजलेल्या त्याला दिसतात, गल्लीकाठच्या गटारींना पूर येतात आणि नंतरच्या गाळावर गांडुळं रेघांकत जाताना तो पाहतो. आसमंतातल्या अंधारात कुठली " भुतेरी गाणी " ऐकायला येतात. रात्रीचे सर्व सोहळे पहाटेच्या निस्तेज डोळ्यांना विद्याधर बांधतो. " जळते दिवे जळत्या रात्री जळते चांदणे जळता मनजाळ " हा सगळा रात्रीचा सोहळा. " अगम्य भुयारातून प्रवास. एक अंधाराचा ठिपका निघालाय अवाढव्य अंधारातून अंधारात अंधाराकडे."

विद्याधरची सगळी शब्दशक्ती त्याचे ( म्हणजे कदाचित माझे आणि तुमचेही असेल! ) अंगभूत दुबळेपण एखाद्या गिधाडाने सडके मांसखंड टिपावे तशी टिपते. त्याचे ओशाळवाणेपण. त्याचा थकवा...त्याची निर्भविष्यता... त्याची कर्तृत्वशून्यता... त्याची असंबद्धता.... त्याचे हरवलेपण...त्याची अतिभीषण दुःखसहनक्रिया..शब्दांचा तोकडा आधार..साकळत चाललेला अंधार ...विलक्षण सुन्नता...एकटेपण...श्वासोच्छ्वासाचा वाढता मंदपणा.

अशा कविता लिहून जो जगत राहतो, खातो-पितो, मित्रपरिवारात हसतो-बोलतो, त्याच्या कविता खऱ्या वाटत नाहीत आम्हाला. त्यात आमची चूक काय ! उगाच भावना उत्रवून लिहितोय, असे म्हणतो आम्ही. वेदनांनी विद्ध झालेले, झोप उडालेले, आयुष्याला विटलेले आमच्यातले कित्येकजण मरणाला आपण होउन मिठी मारायला जातातच असे नाही. म्हणून खुशालचेंडू लब्धप्रतिष्ठांना वाटतात तशा त्यांच्या वेदना खोटया असतात असे नाही.

त्यांना खोटया म्हणणार नाहीत ना, असे विचारता विचारता विद्याधर आमच्यातून गेला.

समजू या की, या वहीतल्या कविता चाळीस-पंचेचाळीस वयाच्या माणसाने रचल्या आहेत..आपल्या जिवितानुभवाचे चित्र दिले आहे..नकोसे झाले म्हणून नंतर जीवही दिला. मग या सगळया गोष्टींचा आम्हाला तेवढा धक्का नाही बसणार. कदाचित आश्चर्यही नाही वाटणार.

पण वीस वर्षांच्या बुद्धिमान सुशिक्षित पोराने एवढा कडू अनुभव एवढ्या दाटपणाने उगाळून आमच्या डोळ्यांत-कानांत ओतावा आणि जीव देण्याइतपत वैतागून दाखवावे, याचा आम्हांला एका रीतीने दुस्वास वाटतो. आम्ही त्याला अविचारी, मूर्ख, नादान म्हणतो.. आणि आपण धैर्यवान, सोशिक, (विवेकी आणि कोडगे) असल्याची स्वतःची साक्ष काढतो. खरे म्हणजे या 'आत्मखुन्या'चे आम्ही माफीचे साक्षीदार. बहाणा करीत जगणारे. आमचे आपले "टोंकाविण चालू मरणे." सिल्विया प्लाथने जे केले, दिल्लीतल्या तरुण शास्त्रज्ञ डॉ. जोसेफने जे केले, कलावंत गुरुदत्ताने जे केले आणि विद्याधरने जें केले ते त्यांना त्यांना करायला लावायला कमीअधिक प्रमाणात कारणीभूत असलेले ... तसे करायची सणक चोरूनमारून डोक्यात बाळगणारे आम्ही.. त्या अंतिमोत्तराची दडस घेतलेले, हताश, दुबळे, ओशाळवाणे. आयुष्याचा दिवसदिवस आस मोडलेल्या खटाऱ्याप्रमाणे ओढत चाललेले.

विद्याधरच्या या वहीत पहिल्या पानावर राम गणेशांना 'गुरुवर्य' म्हटले आहे. 'खिडकीतल्या कविता' असे नाव संग्रहाला दिले आहे. शेवटच्या पानावर वसंत आबाजी डहाक्यांच्या पुढील ओळी उद्‌धृत केल्या आहेत :

—तर हे कवितेच्या देवा
तू आपली प्रचंड दगडी पावलं
या शब्दाशब्दावर ठेवीत जा.
तर हे भुकेच्या, उन्हाच्या
उद्‌ध्वस्त रात्रींच्या देवा
आपल्या अजस्र दगडी पावलांखाली
मला सुखानें झोपू द्या.

विद्याधरच्या कवितांत काळोख तर आहेच. काळोखात एक चक्करवादळ आहे. आणि त्याच्या पोटात एक खांब खडा आहे—एकटेपणाचा. पोकळ पण स्फोटक. पृथ्वीपासून आकाशापर्यंत गेलेला. शहरातल्या घरांदारी, बाजारपेठात, रस्त्यात वावरताना परकेपणाची तीव्र जाणीव आहे. जी म्हणून संगती मिळते ती केवळ आभासमय आहे. कुणासाठी तरी जगायचे एवढाच एक काल्पनिक उदात्त आधार जगण्यासाठी.. आपल्याला सोबत आपली सावलीच फक्त.

पण विद्याधर विचारतो, काळोखात ती तरी कोठली ? काळोखात शरीरही असून नसल्यासारखे होते. फक्त एक संवेदना झगझगत असते. आपण जिवंत आहोत याची. न फुलणारे, न फळणारे जिवंतपण. चंद्रसूर्यांच्या उपऱ्या प्रकाशातही हेच काळोखाचे कवटाळ जाणवते. 'एकटा' या दीर्घ कवितेत ही दारुण व्यथा विद्याधर मांडतो :

...दगडीगार गुहेला झरोके...

...माणसाजवळ जोपर्यंत काही करण्यासारखं म्हणून आहे
तोपर्यंत तो आत्महत्या करणार नाही
तबोऱ्यांना घातलेल्या गवसण्या उतरत नाहीत
मनमृदुंगावरच्या न घातलेल्या थापेवर
उडतच नाही आत्मा कलकलत आभाळात
मनात कोंडलेली मैफल
साचलेल्या धुरळयात कोरीत राहते

...मनाच्या भरतीला उधाण येईल
असे चंद्रच नाहीत

...मनात रचलेल्या प्रतिमांचे डोंगर
कोसळून पडतात
निर्विकार मन कशाकशाभोवती केंद्रित झालेलं असतं
अचानक केंद्रं हरवतात
स्फोटाबरोबरच मेंदूतून लाव्ह्याचे लोंढे...

महाप्रलय
अंधारप्रलय
अग्नीप्रलय
गहनशांतता...

अशा विलक्षण भेदक प्रतिमांनी विद्याधरची कविता भारावली आहे. ढळढळीत मरणमार्गी आयुष्याच्या चिंध्यांच्या ढिगाऱ्यात गुदमरत चाललेली. "दगडीगार

गुहेच्या झरोक्या"तून किलकिल बघणारी. पण किती स्वच्छ पाहणारी ! 'टेक ऑफ'च्या अवस्थेला आपल्या पायांनी चालत जाणारी ! मधल्या अवधीत भेदरलेपणाची किंकाळी, किंवा डळमळल्याची स्फुंदने न देणारी ही कविता.

संपूर्ण विस्कटलेल्या, ठार एकाकी झालेल्या, अत्यंत उदास आणि भग्न मनाची इतकी एकसंध, इतकी एकाग्रदर्शनी, इतक्या संतुलित भावप्रकटनाची तरूण कविता मराठीने पाहिलेली नाही.

विद्याधरची भाषा आजची असून अत्यंत 'चेस्ट', निर्मळ आहे. त्याच्या वयाला शोभला असता तो शब्दांचा अनाठायी फुगवटा तिच्यात नाही. तिच्या आशयाला खपून गेला असता असा शिवीगाळीचा आक्रस्ताळा गदारोळ तिच्यात नाही. तिला तेज करवतीची धार आहे. तिच्याच खाली विद्याधरने अखेर आपली मान दिली. तुमच्या मानवी मनाला रक्तातली सनातन दुःखसंवेदना ओळखीची असेल तर या करवतीचे दाते दाते, त्या वेदनेचे छिलके छिलके आणि तिचा भुगाभुगा तुमच्या कानामनात भरतील.

मरण्याआधीच्या वर्षी एक एप्रिलला (१९१८) गोविंदाग्रजांनी चार ओळी लिहून ठेवल्या त्या प्रसिद्ध आहेत : त्यांच्या खाली त्यांनी "ॲन एप्रिल फूल्स वर्क" असे म्हणून ठेवले होते[१]. . . दुखण्याने वेळीच गठडी वळली म्हणून गोविंदग्रजांना करावी लागली नाही ती आत्महत्त्या विद्याधरने करून टाकली एक एप्रिलला (१९७४). त्याची सगळी कविता 'टेक ऑफ'चे प्रस्थान ठेवलेली कविता असूनही 'डिजनरेशन'ची किंवा नासलेपणाची कविता नाही. तिला तुच्छतेचा, द्वेषाचा व सूडाचा दुर्गंध नाही. विद्याधरचा 'टेक ऑफ' हा सभोवतीच्या मर्डरबाज परिस्थितीचा परिपाक आहे. या परिस्थितीला 'खून' जणू

---

१ यावज्जीवहि 'काय मी' न कळलें आप्तांप्रती नीटसें
मित्रांतेंहि कळे न गूढ, न कळे माझें मलाही तसें
अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट तें होईल तूतें कसें ?
कोठें आणि कधींतरी जगतिं मी होऊन गेलों असें.

स्वाभाविक व अपरिहार्य क्रिया वाटते आणि 'आत्महत्या' ही पळपुटी प्रतिक्रिया. पण ज्याला खुनाची क्रिया करायची नाही त्यालाच आत्महत्येची क्रिया स्वागतार्ह होते. ज्याला वेदनाघन अस्तित्व आहे तसे पाहता येते, अनुभवता येते, पण स्वीकारवत नाही आणि सहन होत नाही त्याला आत्महत्या सोसावीशी वाटते नाईलाजाने.

आहे-पणाची वेदना कमल्याही ओंगळ चित्र-नाटय-नृत्याच्या बदमाश झंझाटाने त्याला सजवायची नसते...बधिर करून सोडणाऱ्या अफू-गांजा-दारूत बुडवायची नसते. "रिलेशन्सची अॅबॉर्शन्स" पदरात बांधून चाललो आहोत ही ज्याची धारणा त्याला लाइनी मारणे, अश्लील बोलणे-चालणे, बेइमानीचे लैंगिक व्यवहार करणे या उपायांनी आपली संवादभंगाची वेदना गिळायची शरम वाटते. जगत जगत जगणाऱ्याच्या या सगळ्या पळवाटा...एका भयारण्यात आज-ना-उद्या नेऊन सोडणाऱ्या. आहे-पणाच्या या विक्राळ संवेदनेचा रोखठोक प्रत्यय सर्वांना घेता येतो असे नाही. ज्याला येतो आणि जो नादान पळवाटांनी जीविताच्या व्यूहात भिरंगटायचे नाकारतो तो थेट नाही-पणाचा शूळ खांद्यावर घेतो. त्याची आत्महत्या त्याच्यावाचून उरलेल्या जगात कसलेही अमंगळ बोचके तर ठेवून जात नाहीच...उलट जळून गेलेल्या कापूरप्राणांचा एक पवित्र स्वाद त्यात दरवळत ठेवते.

ती स्वादस्मृती मला सांगते की कसल्याही लोभापायी, महत्वाकांक्षेपायी, अभिलाषेच्या किंवा आक्रमणाच्या पोटी (म्हणजे त्या त्या गोष्टी मनाप्रमाणे सफल झाल्या नाहीत म्हणून...) विद्याधरने आत्महत्या केलेली नाही. कडाडून भूक लागल्यावर माणूस जसा अन्नावर तुटून पडतो, घराला लागलेली आग ज्या तिडिकेने माणूस विझवायला जातो आणि स्वतः जळून जाण्याची पर्वा नाही करीत, त्या भुकेने आणि आवेगाने विद्याधर मरणाधीन झाला.

आपली कविता प्रसिद्ध होईल की नाही याची विद्याधरला फिकीर नसेल. मरणाच्या डोळ्याला डोळा भिडवून जगत असतांना जे जे वाटले ते त्याने टिपले आहे. असेल पर्वा तर या नचिकेत विद्याधरचे शब्द मराठी कविता

जगणाऱ्यांच्या मणिबंधावर बांधील.. .इडापिडा टळो म्हणून. त्याच्याच निरोपाच्या शब्दांनी ही श्रद्धांजली संपवतो :

आज ह्या चितेने धडधडा गोड गावे
गाईंनी आज अथवा व्याकुळ हुंबरावे
जखमा भळभळती ह्या एकाकी पाखराच्या
चिंबलो अलिप्ततेने पेलेना पाणी पापणीला

दे धाडून तडिताघाता, हे पाऊसवाऱ्या !
विरेल हीही आर्त साद पाखरू जळता जळता

नभी भकास जळत्या नसे नीलमेघखंड
अगा, शून्यतेने कवळिले असे व्योम !

—*—

कै. विद्याधर वैद्य



टेक् ऑफ् : १ एप्रिल १९७४




विद्याधरचे हस्ताक्षर

# अर्पण

कै. विद्याधरच्या आई

श्रीमती शालिनीबाई वैद्य यांना –

## अखेर मलाच हरवलो

हरवलेल्या वाटा सापडत नाहीत
आवळले फास सुटत नाहीत
काळाची कानस घासत राहाते
—तरी आकारकिनारा मिळत नाही

तसा तसा मी स्वतःला शोधत भिरभिरलो
असा असा जग हरवत गेलो
अखेर मलाच हरवलो.

## अंधारवेणा

कुठल्या अंधार आसमंतात कुठली भुतेरी गाणी
गायली, सूर कसे विरत विझत गेले
आत आत कुणालाच कळू दिले नाहीत हिशेब.

या अंधारवेणा कशा सोसवतात बुब्बुळांना
त्यांच्या आतील मनाच्या पाळामुळांना
कशी झिरपत येते आभाळसरींची ही गर्दी
चष्म्याच्या काचेतून आणि पापणीआड
कशी सुकून कुठे जाते निघून.

अथांगाचा थांग लागला नाही, तरी वरती
शून्य ठेवायची हिम्मत शून्य.

# माझा शिशिरडोळा

रिलेशन्सची अॅबॉर्शन्स
केसांतले जलतुषार जसे झिंजाडले.
माझा दूर वहाव, एकलखोर.
केसपिंजरात अंधारकोंडा भरला.

मरणोन्मुख शांत ज्योत जळता चेहरा माझा.
तिचा आगतडोळा माझ्या डोळ्यांना.
अधाशी जाळजिभांनी चाटला
करपल्या मरणेच्छेचा विक्राळ पंजा

समजावलं अंधारगुहेला ठणकावून :
नाकार प्रत्येक सत्यनकार,
दे हुंकार पलिकडल्या डोहाला होकार.

मनगळ होतच राहिली.
उलटसुलट अवास्तव धागे
पिळत गुंतत गेले गुहेतून.
हाती सत्य तत्त्वफोलपट.

माझा शिशिरडोळा
पागल ओघळतोय
न गोठल्याने.

# घराकडे

माझ्या ह्या सांजभरल्या डोळ्यांनी मी पहातो तिची पावलं, सोनेरी धुळीत न उमटता गेलेली. पण ह्या विझून जाणाऱ्या मनाच्या आत आत उमटत पुसटत जाणारी.

मी मूक.

नजर साकळणाऱ्या अंधारात हरवत राहाते
आणि माझ्यातून आरपार सांजपक्ष्यांचे थवे
कलकलत निघून जातात — घराकडे.

— कुठल्या घराकडे ?

# अंकुर

माझी हाडं
तुझ्या सुपीक मांसात
रुजवून घेणं तू मान्य केलंस.

मग अपरिहार्यपणे त्यांच्यावर फुटलेली
हिरवीगर्द काळोखी पालवी का झिजाडून फेकलीस ?

तेही अपरिहार्यच ?

# क्लिफ्स

ईश्वरी अजस्त्र पंजावर आपलं जीवन.

धनरेषेच्या दरीतून उत्साहात
बोटांच्या टोकांपर्यंत पुढे जाऊ नये.
तेथे वाटरेषा भोवरून वर्तुळलेल्या असतात.

आणि जिथून गिधाडं झेपावीत असतात असे,
तीक्ष्ण नखांचे तुटले गगनकडे.

# विश्वास

कोठेहीं जा गावे ओसाडच.
प्रत्येक गावी एक नदी वाहते पण माणसं कोरडीच.
सकाळी सूर्य पेटला तरी संध्याकाळी अंधार उलगडतोच.
अखेर वड कितीही वाढला – पारंब्या जमिनीकडे धावतातच.

—अशा वेळी सगळ्यावरचा विश्वास उडतो.

## तूच दुपारू नयेस

असणे होणे माझेच...
माझ्या ह्या संथ दगडी चष्म्यातून
न्याहाळतोय् पांगळी मुलगी.
कोसळणाऱ्या घरांच्या दगडादगडांतून
एका दुपारीची रणरणवाट.
तू जातेस
डोंगर क्षितिजनिळाईकडे.

नजर वहातेय् रस्त्यावर, नजरेतून वहातोय्
सूर्यंडळमळीचा समुद्रगाज भिनत डोक्यात.

तुझे अल्लड गुलाब
किती पुरतील तुला
सुगंधायला भरदुपारी ?

तूच दुपारू नयेस, मी वाहू नये.

# रस्ते

रस्ते : संध्याकालीन धूलीकल्लोळात
आर्तखिन्नता पिणारे.
अंधारमंद पुलावरचे.

रस्ते : उत्तररात्रीचे संथ डुलणारे.
गारव्याने शहारणारे.
चांदण्यात चिन्तन करणारे.

रस्ते : सकाळची कोवळी
उन्हपालवी फुटलेले.
बाळमुठी उंचावणारे.

रस्ते : डांबरासहित पेटून उठणारे.
ट्रकबरोबर तीरासारखे
चकचकत धावत जाणारे.

रस्ते : दिवसाच्या शून्यचक्रावर
अव्याहत गुंडाळले जाणारे पट्टे
वरून खालपर्यंतचे,

# साठ वजा ती

हिमशुभ्र गगननिवासी शिखरे,
पाचूने लहडलेला आसमन्त टवटवीत,
गूढ, निळसर, धुकिस्त दरीखोरी भारलेली,
पूर्व क्षिति:सीमेवर कलंडलेल्या कमंडलूतून
धोधावणाऱ्या सुवर्णप्रपातात
चैतन्यात न्हाणाऱ्या गोजिऱ्या कोकरांना
हाकारणारी ही आर्द्र लकेर ....

हे आहे
सर्व. सर्व. सर्व.
जसेच्या तसे, जसेच्या तसेच.

पण ह्या इतक्या उंचीवर येऊन बसल्यानंतरही,
अस्पष्ट, तळाच्या, ढग पांघरलेल्या
ह्या अर्धनिद्रिस्त स्मृतिनगरातून
निनादतोय एकच कोलाहल —

" चाळीस वर्षे माझ्याच पाऊलवाटेवरून मागोमागून
इथपर्यंत पहाड चढलेली,
हिरव्या चुड्यानिशी अग्निरसात वितळलेली
'ती ' कुठाय ? "

# गडांचा सूर्यास्त

हे निखळलेले बुरूज ठायीठायी,
हे जुने अजस्र किल्ले,
हा खोलावरचा खालचा आसमंत
भरून आलेला आहे मूककरूण स्वरलयींनी.
हे पसरते हळवे शोकस्तोम
माझ्या विश्वव्यापी देहात हळुवारपणे
झिरपत आहे.

काळोखाचे हे प्रचंड डस्टर
पुसून टाकीत आहे
ह्या सांडलेल्या प्रकाशाचे उरलेसुरले थेंबही.
अंधाराचे तळे झाले आहे.
सर्व हळूहळू तळाला जात आहेत.

या डोंगरावरच्या बोरींची बोरे गोड दळदार असतील
कधीतरी. आता बोराबोरामध्ये आळ्या माजल्या आहेत. . .
पण किती आणि कशाला सांगावे माणसाने ?
माझी शब्दप्रतिमाफुले मेलीत.
त्यांची कातडी झडते आहे.
आणि —
आणि निर्माल्य,
जलौघाच्या काठाकाठाशी
फेसाळ घाणीत
हिंदकळत बसते लाटांलाटांवर.

# स्वप्नांच्या धूम्ररेषा

स्वप्नांच्या धूम्ररेषा छाती खोलवर कोरून निघून जातात.
कमजोरी इतकी, रणरणते चढ चढण्यापेक्षा घाटावरून उडी घ्यावी.
आधार नष्ट झालेले इथे स्वतःच्याच पायतळाचे;
कर्तृत्वाची वर्तुळं आरोहातून अवरोहात उतरलेली;
अन्तर्प्रवासाचा भूतकाळ ढिगावरून तळापर्यन्त.
नुस्ती राखच राख, थोटकंच थोटकं,
अन् डोक्यात गरगरणारी दुपार.

## जीवनग्रंथ

केव्हाची ही जीवनग्रंथाची पानं उलटतोय् !
विश्वरहस्याचं प्रकरण कुठं गेलंय् कुणास ठाऊक ?
सूचीतही संदर्भ नाही.

हातातली ही अस्तित्वाची जळती सिगारेट
बोअर होतेय्,
पण पैसे पडलेत तिला अन्
ती नसली तरी बोअरच होईल.

अखेर कंटाळून मी सूर्य पेटवलाच;
पळत्या सावल्यांना पकडायला किरण धावताहेत.
पृथ्वी गोल.
म्हणून त्यांची पाठशिवणी.

अरे ए कारट्यांनो,
जरा अभ्यास करू द्याल की नाही ? सारखी धावपळ !
कोणीतरी तो सूर्य बंद करा हो प्लीज.
मला झोप येतेय्.

## शून्य आभाळ

आज ह्या चितेने धडधडा गोड गावे.
गाईंनी आज अथवा व्याकूळ हुम्बरावे.
जखमा भळभळती ह्या एकाकी पाखराच्या,
चिम्बलो अलिप्ततेने पेलेना पाणी पापणीला.
दे धाडुन तडिताघाता, हे पाउसवाऱ्या !
विरेल हीही आर्तसाद, हे पाखरू जळता !

– नभी भकास जळत्या नसे, नीलमेघखंड
अगा, शून्यतेने कवळिले आज असे व्योम !!

## खाज

हे पहा माझे नख खाजवतेय्.
हा अंगठा. हे शरीर. हा रस्ता. ही घरं.
हे शहर. हे पहाड. ही झाडे. ह्या दऱ्या.
हा अवघा भ्रष्ट आसमन्त येथला.
ही पृथ्वी. हे विश्व.

खाज. खाज. खाज. खाज.
वासना. वासना. वासना. वासना.

— अहो हे विश्वमित्रांनो, नाकारू नका
ही वैश्विक खाज.
" इनके हाथ कत्ल करो और
जला दो इनके बुर्खे " —
एक लष्करी हुकूम द्यावा.

## धूसर आठवणीतील एक

( "अशी माणसं आपल्या जवळून येऊन निघून जातात पण आपल्याला त्यांची किंमत कळत नाही." — 'कोसला' )

दिवसांच्या लाटांनी आठवणी धूसर होतात
त्याच्यासारख्या. त्यातली एक :

झोप यावी म्हणून निरर्थक आकडे मोजत
जागलेल्या अनेक रात्रींपैकी
एका रात्री तो आला.

गवताळ माळावरून एका अलिप्त पायवाटेने
फिकट चांदण्यात
क्वचित आड येणाऱ्या झाडाच्या फांद्यांआडून
चंद्र पहात नहात
चालत, प्रखर शीळ घुमवत —
"ए मेरे दिल कही और चल
गमकी दुनियासे कहीं दूर चल."
— चंद्रासाठी.

आपण त्याच्याशी बोलायला हवं होतं.
मी दार उघडलं तोपर्यंत तो चांदण्यात
दूरवर तरंगत जात होता लाटालाटांवर
अन् दिसेनासा झाला.

उलटवाऱ्यानं त्याला ऐकू न गेलेल्या
कितीतरी हाका....
— विरल्या गवतझुलीत.

मी दार बंद केलं
अन् ओळीनं दारदार बंद होत गेलं.
— अजून होताहेत.

आता :
अस्फुट शीळ. दुरून जवळ येऊन दूरदूर गेलेली.
( आठवणीत. )
आकड्यांचाच प्रवास झोपेच्या किनाऱ्यापर्यंत.

# काहीच खरं नसतं

काहीच खरं नसतं.
किंबहुना काही खरं असणं वा नसणंही खरं नसतं.

हॉटेल्स सुद्धा बंद होतात दोन वाजता.
अन् वेश्येचं सुद्धा पावित्र्य असतं सौंदर्य-ऱ्हासानंतर
जाणवणाऱ्या गोष्टींच्या किल्ल्यात भिरभिरत रहाणं....

सर्व रात्रींचे सोहळे पहाटच्या निस्तेज डोळ्यांना बांधले —
रस्तोरस्ती ट्यूब्जच्या प्रकाशातल्या संध्या उत्सवांचे,
पिक्चर सुटल्यावर गर्दिस्त झालेल्या हॉटेलांचे, पानपट्ट्यांचे,
नोटांचे, गल्ल्यांचे, खिशांचे,
सुनाट रस्त्यावर पेटून राहिलेल्या दिव्यांच्या खांबांचे,
कोंबड्यांच्या आरवण्यासकट विझत जाणाऱ्या
लाइटांच्या तालावर फटफटणाऱ्या पूर्वेमुळे
निस्तेज होत जाणाऱ्या चंद्रकोरींचे.

असेच सकाळींचे.
सकाळच अशी कोमेजलेली संथ सरपटणारी,
असलं पांढरंभक्क उन्ह मी पहातो गजांतून.
ज्यात उगीच तजेलदार हिरवी वगैरे झाडं न्हात इत्यादि आहेत.
असेच दुपारींचे, संध्याकाळींचे,
जळते दिवे, जळत्या रात्री, चांदणे जळता मनजाळ.

पांढऱ्या भक्क सकाळी, अस्वस्थ अंगमोड दुपारी, शोकान्त संध्याकाळी
— झोपू देत नाहीत.

अशी काळोखी रात्र नशीली अन् तारेतला दिवस,
सगळा जसा अगम्य भुयारातून प्रवास.
दोन्ही टोकं नजरेआड,
फक्त भुयार-अंधार.
मागचा अंधार कसा होता, आताचा कसा, पुढचा कसा -
कुठल्या तुलना कशासाठी ?

एक अंधाराचा ठिपका
निघालाय् अवाढव्य अंधारातून अंधारात अंधाराकडे....

## कोमेजणे

हा माझा कोमेजलेला चेहेरा
कोमेजल्या संध्याकाळी
कोमेजल्या सूर्याची
कोमेजली किरणं
कोमेजल्या कातड्यावर घेत;

आशेची सूक्ष्म जाळी विणीत आहे :
कोमेजणेच कोमेजण्याच्या.

आशा कोमेजली ?

## देठ

मी !
मोरपीस. पोरकं. झडलेलं.
पुस्तकात. अक्षरांच्या काळ्या
गर्दीत दबून गुदमरणारं.
त्यांच्या तलवारी. भाले.
लवलव. लखलख.

माझ्या पांढऱ्या देठाशी एक थडगं.
आणि माझा डोळा शोधतोय् दूरवर
देठापलीकडचा असाध्य मोर....

# निरग्नि शिशिर

तुझ्या गर्द आरसपानी निळ्या नेत्राईच्या
पानापानांआडून डहाळी-डहाळीवर
रसरशीत जर्द जास्वंदी निखारे फुटले.

तेव्हा तलावात एक राजहंस
क्षणभर डुबकी मारून न्हाऊन गेला.
पंखाचा फडफडाट आभाळात झुलत राहिला.
तेंव्हा मी झालो
अग्निवर्षावातला योगसाधक
शिरपेचधारी 'सम्राट गुलमोहर'.

अमावस्येच्या ढगालाही
नक्षत्रांच्या कैफाची
लखलखती किनार
झालरलेली असतेच:
मला म्हणायचंय् ते हे.

पण ह्या कुंद, अभ्रिस्त
पाचोळ्यावरही बर्फ साकळलेल्या
निष्पर्ण पंडु शिशिरात
संगीताच्या सर्व तारा गोठून गेल्या आहेत.
शिरपेच पायतळाशी रक्तभरून.

## स्वतःस सरणून

किती एक पावसाळे. कितीएक
पूर गल्लीकाठच्या गटारींना.
कितीएक गांडुळं रेघांकत गेली
गाळावर नंतरच्या.

पाहिलं प्रत्येक गांडुळं.
जीव ओतून. समर्पणून.
स्वतःस सरणून.

## ही निराशय जडता

हे पृथ्वीचं केन्द्र तुला सतत खेचतंय्,
ही निराशय जडता तुला गिळू पहातेय्;
सुन्न निष्क्रिय दुपार.
म्हणून नुसतं पडून रहाणं सुद्धा सुखाचं नाहीच;
पाठीला रग लागेल, फाखळच्या कुशी कान मान दुखेल.

आणि तुला सुटता येत नाही आखल्या वर्तुळातून;
नीट समजून घेता घेता धडपड मंदावेल तुझी.

तेच शेवटचं खरं : अन् त्याला आकार नाही, रंग नाही, गंध नाही.
नाही. नाही.
सांगताही येत नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२३५६
क्र. क्र. ८१०५
२३५०
शाखा (स्थळ प्रत)

## अंदाज : जन्माविषयीचा

माझा जन्म केव्हा झाला, कल्पना नाही काही.
पण – सीताकान्ताचे संयमी पोट फाडून राधारमण उच्छृंखल
किंवा भगीरथ जाळून तळीराम
घेतात ना अवतार,
तेव्हा कदाचित
— आपला एक अंदाज.

# तीन कविता : आत्मखुन्याच्या

१.

मी 'कोसला' सोसला आहे.
'पांडुरंग' पोसला आहे.
श्रीयुत पांडुरंग टू श्रीपांडुरंग
प्रवास करून काय मिळतं ?
एक प्रचंड वर्तुळ गरगरतं.
गतीने भोवळ येते अखेर !
— विश्वरहस्याचं तरळ मृगजळ
आणि वाळवंट, वाळवंटात वावटळ.

२.

एक उन्हाळा येतो,
सर्व गुलमोहर मोहरतात.
सर्व गुलमोहरांना फुलून
एक उन्हाळा आणता येईल का ?
किंवा सर्व उन्हाळे आले
तर एक तरी गुलमोहर फुलेल का ?

३.

मनाच्या थडग्यात चिंतांची प्रेते,
इच्छांची थिजली थारोळी.
संस्कृतीच्या उदबत्त्या वरती,
आणि छद्मी फुलं हास्याची.

कोणीतरी शोधा रे माझा खुनी !

# हाक

खाजगी हवेल्यांसमोरील
सार्वजनिक फुटपाथवर
संत्रस्त पावलांनी
स्वप्नांची नीलशिल्पे उध्वस्तत जातो.
त्या विकल ओसाड संध्याकाळी
रोमारोमातून आर्त कोंभ हाकेचे
लवलवत असतात – तें तुझ्यासाठीच.

– अनाद, अनुत्तरित.

## दिशाभूल

मी त्यांना ओरडून सांगितलं कितीदा
" झालीय् सायंकाळ. "
पण ते म्हणाले अट्टाहासानेच
" छे, छे, ही पूर्व. "
त्यांची दिशाभूल झाली, कौतुक झाले.
सोनेरी रंगाचें. पण फसवे.

कित्येकदा नग्नलो सोलून कातडी
" विनय हा. " परन्तु म्हणाले.

काळेंच आहे तोंडाला, तेंच सांगितले.
समजले नाही त्यांना तेंही.

अपेक्षेप्रमाणे काळोख पसरला ( माझ्या ),
कोल्हेकुईनें दुमदुमले रान.

– तेच....ते मरणोन्मुख सूर्यस्तुतीवाले.

# अवर्षणाची बांग

धुक्याची वाट. धूसर ललाट
अवनीचा.

नदीचा काठ. धुंद भाट
सृष्टीचा.

भंगला घाट. गूढ सळसळाट
पिंप्ळाचा.

कुईकुई रहाट. नक्षत्रे लखाक
लाखोलाख.

मंद सुगंध. उगळे निशिगंध
शीत आसमन्त.

तेजाची पहाट वितळे जळात
झुळझुळाट,

– जिवन्त चिन्ता धडाडली एका अन्तरात कोण्या
"क्षुधाग्नीत माध्यान्ही काय समिधावे निजल्या पिलांच्या ?"

# उत्खनन : चारित्र्याचे

म्हणून
मोहेंजोदारो अन् हडप्पा,
उत्खनन यांचं नको, नकोच नको.

भरलं आभाळ ठिबकतांना,
विचारतं सोडून निःश्वास,
संस्कृतीच्या त्या अस्तित्वाचा
खुलासा अगतिकतेनं.

विद्युद्रेखा अन एखादी
दग्धते उत्क्रान्त स्तरांना.

# वासना-वादळ

वासनेची ही घोडदौड करणारी भुतं
आडदांड काळोखात हाडांच्या नळ्यांच्या भुयारात
फेसाळत्या, उकळत्या, जळत्या, जाळत्या
लाव्ह्याच्या तीक्ष्ण धारेप्रमाणे परजीत तरवारी
उन्मादत राहतात रात्रीच्या माळावर लढाऊ झिंगल्या रेड्यांप्रमाणे.

त्यावेळी मेंदू
बंदिस्त कठीण शिरस्त्राणात.
दोन अजस्र खडकांच्या फटीत तडफडते
विकल अगतिक हरिण जणू.
भावनांचे पवित्र ससे अंधारल्या बिळात
ऐकत विजांचा कडकडाट.
काळोख. काळोख. काळोख.
वादळ. वादळ. वादळ.

उलट्या नखांनी पिशाच्यांच्या
सर्व झाडे हिरवीगर्द उध्वस्त
मनाच्या रानात.
एकाएकी वादळभूमी शांत.

गुबगुबीत ससे नितळ उन्हात लोळत राहतात
सोज्वळ पांढरेपणे.
अन् ऐकू येत राहतें मेंदूचे एक दुर्लक्षित कण्हणे
विकल केविलवाणे.

## उरलेल्या गोष्टी

गेली ती आभाळातील मस्तकं
आणि खुजी घरं त्यांना वागवणारी,
राहिली फक्त डोक्यात आभाळपोकळी
अन् घरं पांढरी फेक उंच ढोलीसारखी....

चांद्ररसाचे कोमलतरंग ते गेले
तृणांकुरित भूस ते नाही निथळवीत,
रात्री अमावस्येच्या ह्या किरकिरत्या
गुदमुरत्या भयाण फाटक्या अंधाराच्या ....

सोरेकाराची पिल्लं होती चांदवीत
मंद मंद रुणझुणत्या बैलगाड्यांना
गुलाबी अंधाराची सुवर्णझाक
वाहवीत होती नदी तरल पहाटचांदी ....

खरखत गेले ते आता सौंदर्यबन
उरले रक्तबंबाळ काटयांचे शल्लिल बन
दुपारच्या तापल्या डांबरी काळपट्टयावर
दडदडत किंकाळत आता लॉरी जाते धावत....

रिकाम्या उदरात असे पूर्वी अपार माया
फुगून पोटं आता तटातट जातात वाया
फुटतात ती आणि सडकं निमकहराम,
शिव्यांचा सुरा घेउन सोबत, अन्न ओकतात ....

गेल्या 'मुरल्या', 'फुटक्या तपेल्या' अन् ती
जुनाट 'पिंपळपाने'
उजाड घडला संसार, आता आत्महनणे
गळफासाने....

# असं वाटतं कधी कधी

असं वाटतं कधी कधी की
गाणं जखमी उरातलं
येईल बाहेर किंकाळत;
पण उसासतंच ते केवळ
अन् मूक अश्रू ढाळत
तळमळतच.

असं वाटतं कधी कधी की
मनाच्या पाणलोटात
अडकलेला हा पाषाण
गडगडत निखळून चळेल
भरभरा; पण तो
झिजतोय् तिथंच.

असं वाटतं कधी कधी की
मनातला हा अग्निस्फुल्लिंग
पेटेल धडाडून,
अन् वणव्यात त्या
चिता दाही दिशांच्या
अन् अनिर्बंध मनाच्या
होतील राख, खाक.
पण राखेच्या ढिगाखाली
होऊन अस्तित्वहीन
ते धुमसतंच खोल.

कधी कधी असंही वाटतं
परमेश्वर हृदयातला
चमकेल तारकेसारखा;
पण तो काळवंडतो
उल्केसारखा.

असं वाटतं कधी कधी की
राजहंस मनातला
हा चालेल डौलदारपणे
पण गिधाड एक
कर्कश केकाटतं केवळ ....

## रुधिरलिप्त द्विपद

गोंधळ. गडबड. गडबडा.
लोळणे. आदळणे. आपटणे.
लोळागोळा.

फूत्कार. सोंड. विळखा.
सुळे. शुभ्रता. उन्माद.
उन्हाळा.

शिरपेच. नथ. चमक.
दूल. हास्य. विकटता.
छत्रचामर.

"पाणी." "लघुशंका पाजा."
सावली. साकळणे. अंधार.
× × × ×.

तेथे तू अजूनही जा,
तुला तेथे हत्तीच्या पावलांचे लाल ठसे दिसतील.

# अशा तशा मैफलीत

अशा तशा मैफलीत दिवस जायचेच होते,
मनात रुळायचेच होते सूर अंधाराचे,
जिने उतरतांना अंधारात कोलमडून पडायचेच होते,
वाहत्या जखमांचा प्रवाह अंधारात मिसळायचाच होता....

कधीतरी अनाकार भविष्यातून प्रकटतील आपले आकार
म्हणून वाट पहात, चालत, ठेचाळत,
फुलणारे झडणारे, फुलणारे झडणारे गुलमोहर
मोजीतच गेलो, मोजीत जातोय्....
अशा या प्रवासात एकटाच निघालोय् तापत गोठत.

काल म्हणत होतो – हे पूर्ण करू, ते पूर्ण करू.
ते झाल्यावर आज म्हणतो –
गेलं ते सरलं, आता पुढचं पाहू.
कशासाठी ?
कालच्या अपूर्णतेच्या रेषा आजच्या आकृत्यांना
ओठंगून कशासाठी राहातात ?

जमा काय, वजा काय.... काहीच होत नाही,
गुणाकार नाही, काहीच नाही,
आकड्यांच्या माळाच माळा शून्याच्या आतल्या कडेनं
अन् गणिताचा आभास !

हाडांना कसे फुटतील गुलाब ?

# 'मी' चे संशोधन

मी आहे एक लेखणी
लटकती
आयुष्याच्या लटकून
धाग्याला.

धागा अनिश्चित
अकथ्य लांबी
तुटणार कधी ?
– अकथ्य.

अगतिक लेखणी
जगाच्या कागदावर
रेघोट्या
रेघोट्या
रेघोट्या आणि रेघोट्याच
कारकुनते.

कारण –

वारा नियतीचा
सारखा तिला
चालवतोय –

रेघोट्या असंख्य
फराटतात वेड्यावाकड्या
'मी' ने...

फराटे तें, पोट
फुटेस्तो खदखदवते
इतर लेखण्यांना.

सुसंगती दृष्ट
'मी' ला त्या
जास्त भडक घाण
इतरांची दिसते,

लेखणीत भरावीत
मृगजळे असंख्य ....

## अंधाराचा रस्ता

तुझं  मृगजळ असं का झिमझिमतं
या काळ्याशार शेतावर ?
ही बघ बीजं तरारण्याच्या
स्वप्नात धुंद झालीत.
मी त्यांना जाळून टाकण्यासाठी
पुन्हा सूर्य कोठून आणू ?

प्रचंड कोसळ तू.
तुझे सत्यवादळ.
महापुरात वाहून सडू देत
ही बीजं.

ह्या तगमगीच्या धुक्यातून निदान
सापडेल अंधाराचा रस्ता मला.

## चिन्तन

बसलो होतो नागडा उघडाबंब,
तेंव्हा मी लोळत होतो धुळीच्या मायेत.

–अन् झपाटलं कडकडीत कपड्यांनी जेंव्हा
मला लाज वाटू लागली मायेची.

# नियती

कुणाच्या हातात नियतीची दोरी, मागून मी कुत्र्यासारखा
ल्हाल्हा करीत, वळत वळत, हिसडे देत देत.
येत्या जात्या ढगाकडे पाहून खडकावरले बीज
जळून राख झाले तडफडून अपार.

जागोजाग काठ्या खाल्ल्या या शिवारात
अन् सावलीला आलेल्या नाठाळ गुरासारखा
घट्ट बिलगलो, स्वत:लाच विझवताना
पळसरानच्या हिर्व्या बोलीला.

माझेच कातडे कमवून बनल्या बुटांच्या लाथांच्या
अगणित मुसळधारात चिंब भिजत राहिलो,
दिव्यांच्या खांबाशी मंद मंद जळत्या.
( तोही त्याच पावसात. )

आभाळाच्या डोहावरच्या निशातवंगातून
आली एक वीज सळसळत, जळत जाळत.
पडणार म्हणता, पडली दादांच्या अंथरुणावर
पळालो हाकारत सैरावैरा विजेच्या शोधात.

दिवा विझलेला. पाऊस अन् अंधाराचा वर्षाव ....
चाचपडतांना रक्ताळल्या बोटांचे ठसे अद्याप
आहेत जीर्ण वह्यांच्या पिवळसर पानांवर.
रक्ताचे ओहळ मृगजळाच्या धगीने सुकले पळता पळता.

दादांच्या चितेभोवती फिरता उजळल्या चेहऱ्यांनी
झिरपतांना करपवले डोळे....

# उजेडात

मध्यान्तर. लख्ख दिवे. सर्व थेटर स्पष्ट.
मागे वळून पाहिले. उगीच
– माझ्या बरोबर (पिटात अर्थात्) असंख्य मी बसलो होतो.
आणि
मागे कोचांवर रंगभूमीवरची प्रेते हारीने.

## न्याय

रंकळ कुटिकांचा
विराट संसार;
अन् रावांची पाहिलीत
राउळे – की वाटते,
संस्था देव नावाची
असेल निर्दय.

पण –
मुंग्यांच्या वारुळातली
दिसते जेव्हा
मधुर साखर;
अन्
निर्निद्र सिंहाच्या
भुकेल्या आरोळ्या
आलोचन,
येतात ऐकू तेव्हा –
वाटतं, ते सर्व खोटं.

## मी : गतिमान

मी : गतिमान. धुंद. पुढेपुढेच.
माझे पाय भिजले आहेत
काळ-समुद्राचा किनारा तुडविणारे.
दिवसांची वाळू चिरडत जाणारे.

माझे पाय दमून श्रान्त. फिरून फिरून.

मी : गतिमान. धुंद. पुढेपुढेच.

माझे पाय गारठून बधिर.
संवेदनाहीन.

नजरेला जाणीव : मागे पडतोय् प्रदेश.
बुडून मरतोय् सूर्य.
पाय बुडतांना दिसताहेत.

मला पाय दिसत नाहीत.
माझे डोळे भिजले आहेत.
जाणवतोय् पाण्याचा झुळझुळीत पडदा.

मी : गतिमान. धुंद. पुढेपुढे च.

# स्मृतिममीवर

स्मृतिममीवर अजस्त्र पिरॅमिडीन,
गाडीन, पृथ्वीचा गर्भगंध देईन.

आठवणींचे सर्व तुतेनखामेन
तरवारींसकट अंधारपापणीत म्यानीन

# पापणीकड जळत जळत

तवंगुन रात्रीरात्रींवर वांछातरंग
डोळां जड लाली
हरवुन भान मिसळुन रंगरंग
छबीसावलीत मस्तक दंग

तिचे संग चुकवुन पहाटरंग
आभाळ आभाळ केशरी नभसावली

छातीत कोरिव शिल्प
मुठींवर छिन्न रंगावली

सर्व मुद्रा पोळुन
पाळुन रस्त्यांच्या शपथा
डोळां जड रात्र गळत
पापणीकड जळत जळत....

## लग्न

लग्न म्हणजे नाकातल्या नथी,
आहुत्यांचा धूर,
उघडलेल्यां ट्रंका,
खसखस कोऱ्या कपड्यांची,
अन् त्यात मिसळलेले
साबण पावडरींचे
संमिश्र वास,
अन् उकाडा असह्य,
उशीराचें बेचव जेवण
बुंदीचे, अन् सांडासांडी
पाणी अन् पदार्थांची;
अन् जागणे रात्रीची ....

— इतकंच मला वाटतं.

## तारका तळाच्या

नजरांनी वाटा भिजल्या तुझ्या.
अचानक वाटेवाटेवर कोंभ दाटून आले
तुझ्या रक्तचंदनी पदपुष्पांचे अखेर.

फुलांनी अन्तःकरण झिजताहे.
उघड्या पडू दे दिव्य शिलालेखांच्या तारका तळाच्या.

# मनाचा गलबला

माणसं....माणसं....माणसं....
त्याच त्याच पदार्थांनी जीभ मेली तरी देहधर्म म्हणून खाणारी,
अतृप्त राहणारी, अतृप्तता लपवणारी,
जन्मभर कशावर तरी डोळा ठेवणारी,
जन्मणारी, जन्मवणारी, मरणारी,
चाळींमध्ये, गल्ल्यांमध्ये, फ्लॅट्स्मध्ये,
शांततेत; गावाबाहेर, बंगल्यात, फुटपाथवर,
– माणसं सांडलीहेत, भुणभुणताहेत, थुंकताहेत.

सगळ्या गोष्टी क्षणाक्षणानं ढासळणाऱ्या –
हे वाड्यांचे दर्शनी दरवाजे, पिंपळपार, चाळींच्या गॅलऱ्या,
त्यांच्यातली आडोशाची स्नानगृहे, पत्र्यांचे महाल तकलादू;
धूळ धूळ रस्ते, खेळणारी मुलं, आवाज, धूर, संध्याकाळ, दिवे लागण;
स्वयंपाक.

संथ शरीरात मनाचा गलबला....

## उदबत्तीच्या रेशिमधुरासारखे

उदबत्तीच्या रेशिमधुरासारखे
सूर होऊन विरत आभाळजळात
आपलं विरविरीत अस्तित्व.

संध्याकाळच्या अर्धअंधारात
झाडीत दाटलेल्या सळसळ सावल्यांचं
आपलं दुःख काळंभोर, गोठून जावं.

## प्रश्नचिन्ह

कित्यक वेळा भडक वस्तू ताठर अन् निर्लज्ज;
होतात मधुर, फिक्या, सुसंस्कृत मंडपासारख्या.
असतात जरी धुळकटलेल्या,
जाऊन बसतात निरभ्र अवकाशात. स्वच्छ पवित्र.

वाल्या वालमीक

राघवे

शिळा अहिल्या

पण इथंच केवळ
एक कुत्रं हुतभरलं
का राहतंच हृदयात ? ? ?

रे रघुराजा.... !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शा. क्र. 22340 ३१०५ 2340
शाखा (स्थळ प्रत)

## आनन्द सैगल

विचाराच्या तन्द्रीत, रस्त्यातून धुराळलेल्या.
स्वप्नाळू. एकलकोंडा.
“ जीवन असावं आनन्द सैगल सारखं.
(आपण ‘ राजेश ’ चा ‘आनंद’ पाहिलात ना ? )
जीविताच्या बुडत्या
सूर्याला, अस्थिपंजर विशेषतः नश्वर
देहाचे, देऊन अर्घ्य
धुंडावे अज्ञेय, अन् साजरावी संध्या.”

जातांना, खच्चकन् ऐकले ब्रेक्स कर्कश.
– अन् झालो बाजूला
( वाट दिली ! )

## एकटा

ह्या सगळ्यांच्या एकत्रित महानगरात
मी माझी परकी पावलं उचलत एकटाच ओशाळवाणा फिरतो.
पाटीवर लिहिता लिहिता अचानक पेन्सिल किरकिरावी,
तशी अचानक नियतीची थप्पड खातो.

घटना विघटनांच्या तालासुरांवर हालचालींच्या मुद्रा
ओळींमागे मिळवायची सहानुभूती.

स्वतःला कशात विसरता येईल...
संध्याकाळपर्यन्त बाहेर न पडूनही फरक पडत नाही.
एकटाच संध्याकाळी उचलली न जाणारी पावलं उचलत
डोक्यावर चंद्राचा भार लादून
एक पाऊल चालू नये इतका थकवा. पण चालत
खालच्या सावलीकडे पहात, तुडवीत.
बराच काळ अंधारा रस्ता, अंतराअंतरावर टयूब्ज
एक एक येई, थकल्या पावलांचे तोल...
कधी टयूबची लांब रेषात्म सावली.
ती नष्ट होत जाई, तशी चंद्राची सुरू.
लहानखुरी अस्पष्ट चांदण्यात दिसणारी,
दोन सावल्यांचे खेळ पहात.

अन् लगेच प्रकाशानं उजळून माणसांनी निथळून बाजारपेठ...
डोळे किंचित् किलकिलले, सरावले चक्र मस्तकात.

पण ह्या कशाशीच संबंध नाही —
आपण एकटे असतो,
सगळेच असतात,
संगतीचा आभास पत्करतात.

नियतीचं एक सोडलं तर दुसरं कुठलं अन्त:सूत्र आहे
यांना जखडून ठेवणारं ?
यांची जीवनं सुस्थिर.

कुणासाठी तरी जगण्याचे आधार आपल्या उदात्ततेला
— बाकी आत्मनिष्ठा.

अखेर बरोबर येईल ती सावलीच असेल,
तीच फार तर सोबत.
पण कदाचित तीही नाही अंधारात,
हे शरीरसुद्धा नाही,
तेही अंधारात कणकण विरून जातं...
फक्त आपली एक संवेदना झगझगत असते
एकटी.
अन् आपल्या हिशेबी बाकी काहीच नाही
असंच उजेडातही जाणवतं

दगडीगार गुहेला झरोके

माणसाजवळ जोपर्यन्त काही करण्यासारखं म्हणून आहे
तोपर्यन्त तो आत्महत्या करणार नाही.

तंबोऱ्यांना घातलेल्या गवसण्या उतरत नाहीत,
मनमृदुंगावरच्या न घातलेल्या थापेवर
उडतच नाही आत्मा कलकलत आभाळात,
मनात कोंडलेली मैफल साचलेल्या धुरळ्यात कोरीत राहतो....

एक एक क्षण असा पुसटत गेला—
थोटकासारखा आठवणी फेकून देत राहिलो.
टेबलाला पडलेले चहाचे डाग पुसून टेबल स्वच्छ करीत राहिलो
उद्याच्या डागांसाठी.

मनाच्या भरतीला उधाण येईल असे चंद्रच नाहीत,
किनाऱ्यावरून सरळ समुद्रात उतरणारी पावलं
डंख मारीत नाहीत.
कारण असं काही नसतंच.
असलं तर ते सापडत नाही.

कुठवर नजर पोचली कळलं नाही आभाळात.

नवीन गावात शिरून आवश्यक तेवढेच रस्ते अजमावलेत;
तेच वापरतो, सगळे ओळखीचे करून घेतो.
तारखा कुठवर मोजता येतील, हिशेब दिवसांचे कुठवर....
अन् अचानक एके दिवशी टेक् ऑफ्

असंबद्ध मानवमालिका...
डिक्शनरीतल्या शब्दांसारख्या
मीही माझ्याजागी अल्फाबिटिकली.
मी ध्रुवप्रमेय.

मनात रचलेल्या प्रतिमांचे डोंगर कोसळून पडतात,
निर्विकार मन कशाकशाभोवती केंद्रित झालेलं असतं...
अचानक केन्द्रं हरवतात.
स्फोटाबरोबर मेंदूतून लाव्ह्याचे लोंढे –
महाप्रलय
अग्निप्रलय
अंधारप्रलय
गहनशांतता
सबंध राखाडलेला वैराण प्रदेशच प्रदेश.
काळोखमाळ...
सर्वभर भरून केवळ आपलंच अस्तित्व.

शब्दांच्या शालीला भोकं...
एकतर शालीएवढी अर्थाची ऊब टिकत नाही.
अंधाराच्या दोरखंडात अडकून जाळ्यात
काळा मासा.

मी पूर्ण गाडला गेलोय् ह्यात,
पाय फसलेत मुळांसारखे.
मला एकट्यानेच अन् अपरिहार्यपणे सोसायचंय्.

खूप गुंता झालेलं दोराचं बंडल
सुटं करायचं
आपल्या एकट्यालाच.
गाठीच गाठी....
दुसऱ्याने मनात आणलं तरी मदत करता येणार नाही;
आपल सगळं आपल्यालाच सहन करावं लागतं हे अतिभीषण.

विलक्षण सुन्नता, कणकण विरताहेत काळाचे ह्यात.
आणि मी म्हणतोय्
विजेच्या लोळात जळतांना
'लख्ख दिसू दे काळ्या नदीपलिकडला तीर.'

काळोख साकळत जाणारा....
श्वासोच्छ्वास मंदावतोय् अशी अस्वस्थ करणारी कल्पना.

मी उदास.
माझे शब्द उदास.
ही संध्याकाळ, हे पक्षी, झाडं उदास उदास.
एक औदासिन्याचा समुद्र लांबचलांब निर्लहर.
पसरून पसरलेला.

अशा तशा गोष्टीत असं तसं आयुष्य वहावत जातंय् –
पुन्हा असतो तिथेच असतो कायमचा.

सर्वत्र हिरवळ पसरभिजलेली,
चिखलाचे ओहोळ रस्त्याच्या कडधावेने,
मुक्या झाडांवर पानापानांवर थंड सावट अर्धप्रकाशाचे,

असा पृथ्वीचा प्रवास –
ह्या पावसाळ्याच्या पर्यन्तापर्यन्त
मागच्यापासून.
आणि मी असा धावत्या सरींबरोबर धावत जातोय्...
काचेकाचेवर थेंब थेंब ओघळणारे, दृश्य पुसटणारे
बंदिस्त करून ठेवतो सर्व क्षण धूम्रवर्तुळात.
हे आपल्या खांद्यावर लादून कुणी हाकलतोय् पुढे.

ओळी सांधल्या जात नाहीत.
मनातच भरकटत राहातात.
मेंदूत काहीतरी दाटून आलय् असं वाटतं
जे आपण व्यक्त करू शकत नाही.
बाहेरच्या उन्हासारखं भरून राहतं सर्वभर,
किंवा हॉटेलात स्टोव्हच्या भरभराटात भरलेल्या कलकलाटासारखं..
ज्यातून निष्पन्न काही होत नाही.

जे आपल्यालाच व्यक्त होत नाही असं सहन करणं
एकट्यानं.
त्याच्यापासून दूर पळून जाता येत नाही,
त्याच्यावर हल्ला करता येत नाही.

आपण एकटेच झिजत जातो
तळापासून.

## आत्महत्येपूर्वीच्या कविता
( काही तिच्यासाठी : काही त्याच्यासाठी )

माझा आत्मा भटकतोय्
अस्वस्थ दारोदार;
आपल्या अपूर्त इच्छा आकांक्षांची ...
लक्तरं सांभाळत.

कुठून कुठून दूरवरून कसले कसले
आवाज येतात. असं वाटतं
तू आलीस निदान या क्षणी तर ...
— पण तू कुठली यायला ?

कुठून दूरवरून हे प्रकाशाचे
झरे ओहळत येत आहेत.
कुठल्या समुद्राचा आवाज
कानात घुसळतो आहे.

मी हे असं अपूर्ण सोडून का जातोय् ?
( जावंसं वाटत नसताही... )
— तू अश्रू वाहशील ?

भिंग भिंग सूर मारले मनात
माशाची तळमळ जाळचातील
– गुहेतल्या अंधारात तुला
कसली पावलं ऐकू आली ?

And pity from you
is more dear,
than from any other.
– O, Death !

कुठल्या प्रदेशात वहावतोय् ?
संवेदनांची दारं करकरत बंद
होताहेत का ?
कसली जड कुलुपं लटकलीत ?

मला जे हवं होतं,
जे माहीत करून घ्यायचं होतं,
तें हे आहे, की थोडी
वाट बघायला हवी ? अजून ?

अखेरचं खरं सांगून टाक;
—वेळ थोडा आहे
बोधिवृक्षाची फुलं चुकून
पडतील कबरीवर.

मी नाकारतो एकवटून.
पण माझी हळूहळू वाफ होते.
पराभूत मी.
भरून रहातो, तू भर.

मी तुला सांगणार नाही.
अस्तरवीकडे अंधारपावलं
हळुवार (जशी त्याचीही)
— तसं तुला कळलं पाहिजे.

कसा अलगद उचलतोय् तो.
माझा हात धडपडतोय्.
तुझा हात धरण्यासाठी.

कृपा करून मला
लौकर मिळीत घ्या.
तू तरी किंवा
तो तरी.

## टेक् ऑफ्

भतीची बीजं हृदयात फुलावीत
असे श्वासच अस्तित्वात नाहीत.
सगळीकडे उच्छ्वासाच्या घरघरीची
कोंदटलेली घरं,
त्यांच्या दारांना मळलेले पडदे,
बाहेरचा अंधार कळू नये म्हणून.

कुठे जाणार ह्या एकाच विचारानं अडवलेले सगळे रस्ते.
परत फिरण्यासाठी निदान घर असतंच हे ठीक.

उद्याच्या चित्रात रंग असेल
म्हणून आजची रंगहीन रेखाटणं;
पुढच्या ओळीतून कदाचित सांगता येईल
म्हणून आधीची ओळ खरडणं
– एकूण सगळ्याच ओळी खरडलेल्या...
वाटचाला आलेले सगळेच प्याले बेचव जहरी नाहीतच.

वाटायच्या गोष्टी वाटतच राहतील,
टेक् ऑफ्ला सगळंच उचललं जाईल,
माझ्यासुद्धा, सगळ्या सुद्धा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २२३५८ ५१०५ २३५०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0022357
REFBK-0022357